# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक १२/०७/२०२४ (शुक्रवार) दुपार**


## विदर्भाचे पंढरपुर धापेवाडा येथे आढावा बैठक

पंढरपुरला जे वारकरी जाऊ शकले नाही. ते वारकरी विदर्भातील प्रतिपंढरपूर म्हणुन विख्यात असलेल्या श्रीक्षेत्र धापेवाडयात विठुरायाच्या दर्शनाला येतात. विदर्भ पंढरपुर म्हणून गणल्या जाणा—या श्रीक्षेत्र धापेवाडयात चंद्रभागेच्या तीरी विठ्ठल रुख्मीणी मंदिरात गुरुपौर्णिमेच्या दुस—या दिवशी पंढरपुर येथुन प्रत्यक्ष भगवंत धापेवाडयात दाखल होतात, अशी आख्यायिका आहे. या दिवशी हजारोच्या संख्येने विदर्भासह मध्यप्रदेश व इतर ठिकाणाहुन भाविक मोठ्या प्रमाणात श्रध्देने येत असतात. यंदा ही यात्रा भरणार असल्याने भाविकांची सोयी सुविधा करणे सुरू आहे.

श्री क्षेत्र धापेवाडा येथे आषाढी एकादशी निमीत्त दि. १७/०७/२०२४ रोजी व आषाढी प्रतिपदा निमीत्त दि. २२/०७/२०२४ रोजी मोठ्या प्रमाणात यात्रा भरणार असल्याने मा. श्री हर्ष पोद्दार पोलिस अधिक्षक नागपुर ग्रामीण व श्री अनिल म्हस्के सहाय्यक पोलिस अधिक्षक सावनेर यांनी संयुक्त पणे भेट देवुन यात्रा परिसराची पाहणी केली. व आढावा घेवुन मंदीर ट्रस्ट कमेटी सचिव सदस्य यांना भाविकांचे सुरक्षितते बाबत उपाय योजना करण्यात बाबत मार्गदर्शन सुचना दिल्या. कोणतीही अनुचीत घटना घडु नये शांतता व सुव्यवस्था राखण्याचे दृष्टीकोणातुन मार्गदर्शन करण्यात आले.

सदर आढावा बैठकीला मा. श्री रविंद्र मानकर पोलिस निरिक्षक सावनेर श्री देवेंद्र वंजारी सहायक पोलिस निरिक्षक कळमेश्वर व श्री रवि पवार, आदित्य पवार, श्री विलास वैद्य श्री विनोद मेश्राम व इतर मान्यवर उपस्थित होते.







पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर